## प्रास्तविक व भूमिका

महाराष्ट्र कवी यशवंत आमच्या गावचे, असे पूर्वी अभिमानाने सांगत असू. खरे तर त्यावेळी त्यांचे मोठेपणही माहित नव्हते की कवितेशीही परिचय नव्हता. उलट एम.ए. ला आल्यानंतर 'झेंडूची फुले' या विडबंन काव्यातून आणि इतर काही वाचनात आलेल्या समीक्षा ग्रंथातून रविकिरण मंडळावर व पर्यायाने यशवंतांच्यावर प्रतिकूल टिकाच पहायला मिळाली. त्यामुळे माझीही दृष्टी त्यांच्या काव्याबद्दल दूषितच झाली. (त्यांचे काव्य न अभ्यासता) एम.फिल. साठी जेव्हा हा विषय सुचविला तेव्हो त्या विषयाची निवड करायला काहीशी नाराज होते.या नाराजीतच त्यांचे 'ओजस्विनी' आणि 'पाणपोई' हे कविता संग्रह वाचावयास घेतले आणि पूर्वग्रहदूषितपणाची मनावरील जाळ्या जळमटे नाहीशी झाली. त्यात आणखी भर म्हणजे यशवंतांच्या निधनानंतर त्यांच्या सहृदयांनी, वाचकांनी, समीक्षकांनी विविध वृत्तपत्र, मासिकांतून जे लेख लिहिले होते ते संग्रह रुपाने वाचायला मिळाले. त्यामुळे तर त्यांचे मोठेपण अधिकच पटले. समीक्षा ग्रंथातील टीका आणि लेखांतून व्यक्त झालेले मोठेपण आणि त्यांची कविता आवडल्याची माझी प्रतिक्रिया या सर्वांचा मेळ बसत नव्हता. तेव्हा त्यांच्या सर्वच कवितांचा अभ्यास करुन त्याच्या कवितेच्या स्वरुपाचा, वैशिष्ट्यांचा मागोवा घ्यावा असे वाटू लागले आणि महाराष्ट्र कवी यशवंतांच्या काव्य रचनेचे विशेष' हा विषय एम.फील. साठी निवडला. कुंदप सरांनीही याला अनुमोदन आणि प्रोत्साहनच दिले.

रविकिरण मंडळाच्या पर्यायाने यशवंतांच्याही कवितेत काही दोष असले तरी या कवितेला अमाप लोकप्रियता मिळाली होती. या अमाप लोकप्रियतेमुळेच अत्र्यांनी या कवितेवर विडंबने रचली व रविकिरण मंडळाच्या कवितेशी लोकांचा परिचय असल्याने 'झेंडूच्या' फुलाचाही रसिक नीट आस्वाद घेऊ शकले. यशवंतांची कविता लोकप्रिय होण्यामागे त्यांनी केलेले काव्य गायनाचे कार्यक्रम होते कारण निव्वळ पुस्तकाद्वारे ती इतक्या लोकांपर्यंत पोहोचली असती का ? की त्यामागील हृदयस्पर्शी आशय हाही त्या कवितेला लोकप्रिय करण्यास कारणीभूत ठरला हे पाहणे हा या प्रबंधिके मागील उद्देश आहे. पहिली ग्रामीण कविता भा.रा. तांबे यांच्या पाठोपाठ गिरीश आणि यशवंतांनी लिहीली. तर या पहिल्या बहिल्या ग्रामीण (जानपद) कवितेचे स्वरुप कसे होते ? रविकिरण मंडळाने काव्यक्षेत्रात अनेक नवनवीन गोष्टींची भर घातली. रचनेच्या दृष्टीने नवनवीन प्रयोग केले. आशयातही परिवर्तन घडवून आणले. नव्या अनुभूतींना स्थान मिळाले. प्रेमाचा शारीरिकतेपासून दूर जाण्याचा दृष्टीकोण आला. त्यात यशवंतांच्या वाटा किती ? त्यांची कविता या संगळ्याबरोबर कशी फुलली, बहरली, वेगळे अस्तित्व निर्माण करु शकली. हे पाहणेही गरजेचे वाटू लागले. त्यांच्या काव्य सेवेमुळे त्यांना राजकवी, महाराष्ट्रकवी, पद्मभूषण हे किताब मिळाले. साहित्य संमेलनाध्यक्ष होण्याचा मान मिळाला. केवळ विपुल काव्यनिर्मितीमुळे हे होऊ शकत नाही. त्यांच्या काव्यात निश्चितच काही गुण असतील म्हणूनच हे पुरस्कार मिळाले असतील. ही भावना मनाशी धरुनच त्याच्या काव्याचा अभ्यास केला आहे.

हा अभ्यास करताना समीक्षाग्रंथातील साधक बाधक टिकेबरोबरच स्वत: त्यांच्या काव्याचे केलेले रसग्रहण आकलन यांचा मेळ घातला. विविध ग्रथांतील उलटसुलट विधानांचा अनुभावाने पडताळा घेण्याचा प्रयत्न केला. हा शोधनिबंध व्यक्तिपर होऊ नये म्हणून यशवतांच्या कौटुंबिक, व्यक्तिपर जीवनाला तपशीलाना ते तपशील माहित असूनही फाटा दिला.

याबरोबरच यशवंताची पार्श्वभूमी, रविकिरण मंडहातील कवी म्हणून त्यांचे नि रविकिरण मंडळाचे विशेष पाहिले आहेत. यशवंत रविकिरण मंडळातील एक कविसदस्य होते. रविकिरण मंडळातले इतर सदस्य राहिले नाहीत तरीही अखेरपर्यंत ते रविकिरण मंडळाच्या नावावरच काव्यलेखन करीत राहिले. एवढी त्यांची रविकिरण मंडळावर निष्टा होती काही ठराविक समानशील वृत्तीच्या लोकांनी एकत्र येऊन हे रविकिरण मंडळ स्थापन केले होते अर्थात सर्वांची मिळवून एक निष्ठा तयार झाली. त्यामुळे प्रत्येक कवीचे वेगळेपणाने नव्हे तर एकसंघपणे रवि किरण मंडाळाच्या कवितेचे काही विशेष निर्माण झाले त्यामुळे स्थूल स्वरूपाने काव्याची समीक्षा करताना रविकिरण मंडळाचाच विचार केला जातो. एकेका कविचा नाही. आणि या कवींचा विचार करण्याआधी रविकिरण मंडळाचा उल्लेख येतोच. त्यामुळे रविकिरण मंडळाचाही अभ्यास करावा लागला. कवि ज्या समजात राहतो त्याचेही काही परिणाम त्याच्यावर होतात. याद्दष्टीने यशवंतांच्या वेळच्या सामाजिक , राजकीय स्थितीचा परामर्श घेतला आहे. व्यक्ती जीवनही समजून घ्यावे लागले. या सगळयातून त्यांची कविता कशी फुलली, बहरली ते त्यांच्या विपुल आणि विविध कवितेचे रसग्रहण करून पाहिले आहे. त्यांच्या कवितेचे विशेष शोधले आहेत. त्याच्या कवितेचे स्वरूपही समजावून घेतले आहे आणि शेवटी त्यांच्या कवितेच्या भाषाशैलीचे उमगलेले स्वरूप विशद केले आहे.

त्यांच्या इतर गघवाड्मय निर्मीतीचा आढावा परिशिष्टात घेतला आहे. त्यांच्या व्यक्तीत्वाचे पैलू अधिक स्पष्ट व्हावे म्हणून यशवंतांच्या धाकट्या भगिनी काशीताई यांची स्वत: घेतलेली मुलाखतही प्रबंधिकेच्या शेवटी जोडली आहे.

खरे तर यंदाचे वर्ष मार्च १९९८ ते मार्च १९९९ हे यशवंताचे जन्मशताब्दि वर्ष योगायोगाने त्याच्या वाड्:मयावरील ही प्रबंधिकाही यंदाच लिहीली जात आहे. यशवंतांना ही एक श्रध्दांजली ठरो.

## प्रकरण पहिले

## महाराष्ट्र कवी यशवंत - वाङ्:मयीन परिचयातून वाङ्:मयीन कर्तृत्व-
## त्यांच्या काव्यलेखनाचा स्थूल परिचय.

१९२० च्या आगेमागे वाङ्:मयक्षेत्रातील अनेक मातबर माणसे कालवश झाली. श्रेष्ठ कांदबरीकार ह.ना. आपटे, अल्प आयुष्य लाभूनही आपल्या प्रतिभेच्या सामर्थ्यावर अवघ्या महाराष्ट्राचे मन जिंकणारे गडकरी, फुलामुलांच कवी रे. ना. वा. टिळक, आणि सृष्टीचे भाट, निसर्गकवी, बालकवी हे सारे प्रतिभासंपन्न ाहित्यिक १९१८-१९ मध्ये दिवंगत झाले आणि साहित्यप्रांतात एक पोकळी निर्माण झाली. १९२० च्या सुमारास ज्याचे अनुकरण करावे असा एकही श्रेष्ठ कवी नव्हता जुन्या कवितेचे अंधानुकरण व पुनरावृत्ती या चक्रव्यूहात कवी सापडले होते. पण ही स्थिती बदलण्यास सत्कालीकन बदलती सामाजिक राजकीय स्थिती कराणीभूत झाली. गेल्या पिढीतल्या साहित्यिकांनी ज्या जीवनातून आणि वाङ्:मयातून स्फूर्ती घेतली होती ते याच वेळी थोडेफार मागे पडू लागले. (१) इतर अनेक घडामोंडीमुळे १९२० हे वाङ्:मय दृष्ट्या मोठ्या संक्रमणाचे वर्ष ठरले. १९१४ ते १९१८ ला पाहिले महायुध्द झाले या पहिल्या महायुध्दाची झळ आपल्या देशाला प्रत्यक्ष फारशी लागली नाही. पण विज्ञानाच्या साहाय्याने जवळ येऊ लागलेली माणसे मनानेही तितकीच जवळ येतील आणि या विसाव्या शतकात पथ्वीला स्वर्गाचे रूप आणतील इत्यादी एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस सुरू होऊ लागलेल्या कल्पना किती निराधार आहेत हे या युध्दाने स्पष्टपणे दर्शविले. ते महायुध्द सुरू असतानाच रशियन राज्यक्रांती झाली या क्रांतीमुळे समतेला सक्रिय आवाहन करणाऱ्या एका नवीन समाजरचनेचा प्रयोग रशियात सुरू झाला. साहजिकच सामाजिक सुधारणेचा परंपरागत चालत आलेला पूर्वीचा संकुचित अर्थ बदलण्याची पाळी जगातील प्रत्येक देशावार आली. (२) वर्गविग्रहाचे व साम्यवादाचे वारे सर्वत्र वाहू लागले. बदलत्या सामाजिक स्थितीचे पडसादही साहित्यात उमटतात. त्यादृष्टीने तत्कालीन सामाजिक ,राजकीय परिस्थितीचे निरिक्षण करणेही महत्वाचे ठरेल. कारण लेखक किंवा कवी हे समाजातच राहात असतात. समाजात घडणाऱ्या घडामोडींचा त्यांच्यावर परिणाम होतो. त्याचेच पडसाद त्याच्या साहित्यात पडतात.

**राजकीय स्थिती** - भारत देश परकीय सत्तेच्या आक्रमणाखाली पारतंत्र्यात पिचत पडला होता. इंग्रजांना घालावून देण्यासाठी पहिल्या पासून प्रयत्न होत होतेच पण १९२० च्या दरम्यान मात्र या प्रयत्नानी दाहक रूप धारण केले होते. देशविषयक प्रेम आणि परतंत्र्याविषयी आत्यंतिक चीड यांनी तरूण मने पेटलेली होती. (३) लोकमान्य टिळकांच्या स्वदेश, स्वभाषा व बहिष्कार ही चतु:सूत्री तरूणांनी स्वीकारली होती. लोकमान्य टिकांनीच सुरू केलेल्या शिवजयंती व गणपती उत्सव यांना राष्ट्रीय सणांचे स्वरूप प्रात्प झाले होते.

टिळकांच्या अस्तानंतर भारतीय राजकारणाला अहिंसावादी असा दुसरा नेता मिहाला ते म्हणजे महात्मा गांधी त्यांची अहिंसा आणि सत्यनिष्ठा या तत्वांनी भारावलेला असा एक गट निर्माण झाला. स्वातंत्र्यासोबतच समतेचे मानवतावादाचे आकर्षण त्यांच्यामुळे लोकांना वाटू लागले. स्वातंत्र्य, समता बंधुता या विचार प्रणाली बरोबरच खेड्याकडे चला हि त्यांची हाक होती.

साहजिकच साहित्यिकांची दृष्टीही खेड्याकडे वळली व 'जानपद' साहित्याचा जन्म झाला. गांधीजींची मानवजाती विषयीची तळमळ , प्रेम, निस्पृहता कोणाचाही अनादर न होऊ देण्याची वृत्ती यामुळे देशातील बहुसंख्या लोक गांधीजींच्या चळवळीत समाविष्ट होऊ लागले पण महात्मा गांधीचे धर्माधिष्ठीत सत्य, अहिंसावादी राजकारण महाराष्ट्रातील अनेक बुध्दीप्रामाण्यवादी तरूणांना पटले नाही. ते साम्यवादी विचारसरणीकडे वळले, कामगारांचे नेते बनले. (४) कारण तोपर्यंत पहिल्या महायुध्दाच्या निमीत्ताने भारताची औद्योगिक प्रगती बरीच झाली होती. कामकारवर्ग काढला होता. पण स्वातंत्र्य मिळवण्याची लालसा तरूण मनाला होतीच. आणि ती अधिक वाढू लागली आणि त्यामुळेच राष्ट्रीय बाणा, पारतंत्र्याची आत्यंतिक चीड स्वातंत्र्याविषयीची चाड, लोकनेत्याविषयीचा आदर, तरूणांचा महान त्याग,इंग्रजी राजवटीची क्रूरता हे कवींच्या कथनाचे विषय झाले. (५) **समाजस्थिती** - पहिले महायुध्द,औद्योगिक प्रगती, शिक्षणाचा प्रसार, राजकीय जागृती इत्यादी बाबींचा परिणाम होऊन १९२० च्या आगेमागे महाराष्ट्रातील शहरात मोठ्या प्रमाणात नवीन मध्यम वर्ग निर्माण झाला. त्यातील बहुसंख्य समाज ब्राह्मण वर्गातील असलातरी इतर जातींचेही काही लोक त्यात होते हा मध्यम वर्ग नोकरीच्या निमित्ताने शहरात गोळा झाला होता. परिस्थित्यनुरूप एकत्र कुटुंबपध्दती लोप पावली होती. समाजसुधारकांनी केलेल्या चळवळींचा परिणाम म्हणून बऱ्याचशा अनिष्ट रूढी नाश पावल्या होत्या. व नवीन पिढी उदारमतवादी बनत होती. आगरकरप्रणीत नवीन सुधारणा स्वीकारीत होती पण अल्पशिक्षित व अशिक्षित आप्तस्वकीय या सुधारणा स्वीकारायला राजी नसत. विरोधच जास्त करीत त्यामुळे जुन्या-नव्या पिढीतील वैचपारीक संघर्ष वाढला.

खेड्यातील समाज हा परंपरेने चालत आलेल्या रूढीनुसारच आपले जीवन घालवीत होता. पण खेड्यातून शिक्षणासाठी व नोकरीसाठी शहरात आलेल्या कवींना त्यांच्या सुखदु:खाविषयी उत्कट जिव्हाळा होता. शहरातील सुधारणा खेड्यात रूजाव्या अशी त्यांची कळकळ असे. त्याबरोबरच खेड्यात निसर्गाच्या सानिध्यात घालविलेला रम्य भूतकाळ त्यांना ओढ लावित असे यातूनच ग्रामीण जीवनावर जानपद साहित्यनिर्मीती झाली.

**स्त्री जीवन** - या काळात महाराष्ट्रातील मध्यमवर्गीय स्त्री जीवनात पुष्कळ सुधारणा झाली. शिक्षणाचा प्रसार मोठ्या प्रमाणावर झाला सुधारणाविषयक चळवळी आणि महायुध्दामुळे आलेली मंदी त्यामुळे आर्थिक ओढग्रस्त. यामुळे स्त्रिया शिकून नोकरी करू लागल्या. स्त्रीला जाचक ठरणाऱ्या रूढीही कमी झाल्या नामशेष मात्र झाल्या नाहीत. पुरूष स्त्री जीवनाकडे अधिक सहानुभूतीने पाहू लागला. स्त्रीया पुरूषाबरोर अनेक व्यवसायात वावरू लागल्या. काही स्वातंत्र्यवादीनी बनल्या काही विधवांनी पुनर्विवाह केले. काहींनी प्रेमविवाहाचा मार्ग स्वीकारला असे असूनही या क्रांतीकारक सुधारणा भिऊन जपूनच वापरीत होत्या. तरीही अविवाहीत तरूण तरूणीचा सहवास वाढत होता. परस्परामध्ये आकर्षण निर्माण होत होते (१९२० पूर्वीहा अनुभव दुर्मिळ होता.)

**(६) यशवंताची जडणघडण** - या बदलत्या सामाजिक राजकीय परिस्थितीतून यशवंतांची जडणघडण कशी होत गेली ते पाहणे उचित होईल. यशवंत मूळ चाफळचे श्रीसमर्थ रामदासांची ही कर्मभूमी त्यांच्यामुळेच या गावाला ' क्षेत्र ' पद प्राप्त झाले. समर्थांचे करडे बोल लहानपणापासूनच कानावर पडल्याने आणि ते अंगी बाणल्याने एक विशिष्ट बैठक मिळाली. वडील प्राथमिक

शिक्षक होते. विचार आणि आचारांनी पुरोगामी होते. लोकहितवादी, हरिभाऊ आपटे यांच्याशी त्यांची चांगली ओळख होती. ते लोकमित्र व मनोरंजन या मासिकांचे वर्गणीदार होते. (७) या दोन साहित्यिकांच्या विचारधारेचा परिणाम यशवंतांवर झाला. टिळकपंथी असणाऱ्या राष्ट्रीय किर्तनकार पटवर्धनबुवा यांची राष्ट्रीय किर्तन यशवंतांनी खूप ऐकली होती. ऐतिहासिक कविता लिहीणाऱ्या अनंततनय, दुर्गाप्रसाद तिवारी, कवी माधव केशव काटदरे यांचेही मनावर ठसे उमटत होते. त्यामुळे राष्ट्रीयत्वाची भावना निर्माण होत होती.(८)

मात्र केशवसुत, रे. टिळक ही कविमंडळी त्यावेळी विद्यार्थ्यांच्या मार्फत पोहोचलीच नव्हती. या नवकवितेचे संस्कार झाले ते पुण्यात स्थाईक झाल्यावर खरे संस्कार झाले ते जुन्या पंडिती वळणाच्या कवितेचे. सांगलीत हायस्कूलमध्ये शिकत असताना कवी साधुदास (गोपाळ गोविंद मुजुमदार) यांचा निकट परिचय झाला. यशवंतांनी त्यांना गुरु मानले. त्यांच्या पंडिती वळणाच्या कवितेचा यशवंतांवर परिणाम होणे स्वाभाविक होते. वृत्त, चाली, शब्दयोजना याबाबतचे मार्गदर्शन साधुदासांकडून त्यांना मिळाल. (९)

१९१९ ला नोकरीच्या निमित्तात पुण्याला स्थाईक झाल्यावरही कवितालेखन चालूच होतं. दरम्यान १९१९ला त्याचं 'मित्रप्रेमरहस्य' हे बत्तीस पानी काव्य प्रकाशित झालं होतं. त्यावर वृत्तरचना, भाषा आणि मांडणी याबबातीत साधुदासांचा प्रभाव होता. पुण्यात आल्यावरही कवितालेखन चालूच होतं. लोकसंग्रह मासिकात कविता प्रसिध्द होत. स्वातंत्र्य व राष्ट्रीय बाण्याच्या कविता लिहित असल्याने टोपण नावाचा आडपडदा घ्यावा लागे. (१०) सुरुवातीला काही काल दासानुदास असं टोपणनाव धारण केलं नंतर तारकानाथ नावानं कविता लिहिली. रविकिरण मंडळात आल्यावर मात्र यशवंत या खऱ्या नावानंच कवितालेखन सुरु ठेवलं.

दरम्यान १९१९ च्याच नवरात्रात त्यांच्या आईचं निधन झालं. ज्या कवितेमुळे त्यांना मोठेपण लाभलं. प्रसिध्दी मिळाली ती 'आई' कविता त्यांच्या मनाचाच उत्कट उद्‌गार आहे. पण तो या घटनेनंतर लगेच निघालेला नाही. 'आई' कविता लिहीली गेली १९२२ मध्ये.

लोकसंग्रहात येणाऱ्या कवितांमुळे अनंततन्मयांनी लोकसंग्रहात जाऊन चौकशी करुन यशवंतांचा 'महाराष्ट्र शारदा मंदिर' या कविमंडळात प्रवेश घडविला. यातूनच पुढे नवविचाराच्या मंडळीचा एक गट बाजूला झाला व त्याने रविकिरण हे नवीन कविमंडळ स्थापन केले (१९२१ च्या जून महिन्यात) यात यशवंतही होते. या कविमंडळात एकमेकांच्या कविता वाचून दाखविल्या जात. त्यामुळेही काही बदल होत असावेत. कवि एकत्र आल्याने त्या सर्वांची मिळून एक निष्ठा, बांधीलकी निर्माण झाली. त्याचेही परिणाम त्यांच्या कवितेवर झाले असतील. या मंडळातील बरेचसे कवी पदवीधर व उच्च शिक्षित होते तेव्हा स्वत: कमी शिकलो असल्याची उणिव त्यांनी उदंड वाचनाने भरुन काढली. रविकिरणमंडळात आल्यावर त्यांची मूळची ओबडधोबड असणारी कविता संस्कार पावली. श्री.बा. रानडे व मनोरमा रानडे यांनी यांच्या कवितेला पैलू पाडण्यास सहाय्य केले.

'मित्रप्रेमरहस्य' नंतर टिळक निधनावर 'तुटलेला तारा' हे त्यांचे काव्य प्रसिध्द झाले. यशवंती (१९२१) हा त्यांचा पहिलावहिला कविता संग्रह. पण रसिकांच्या नजेपुढे ते पहिल्यांदा आले बडोदे येथे १९२१ साली भरलेल्या साहित्य संमेलनात. तेथे त्यांनी ' देहाचा पूल' ही ऐतिहासिक कविता वाचून दाखविली. दहादे मराठी साहित्य संमेलन ह्या कथनाने गाजवले. साहित्यसम्राट श्री. न.चि. केळकर हे त्या अधिवेशनाचे अध्यक्ष होते. आपल्या समारोपाच्या भाषणात त्यांनी यशवंतांच्या ह्या कवितेची प्रशंसा केली.(११)

**कौटुंबिक -**

यशवंत सर्व भावंडांत थोरले त्यामुळे सर्वांची जबाबदारी त्यांच्यावर पडली. आणि ती त्यांनी व्यवस्थितपणे पार पाडली. भावंडांची शिक्षणे केली. पहिले लग्न तितकेसे समाधानकारक ठरले नाही. पत्नीचा विक्षिप्त स्वभाव त्रासदायक ठरत होता. शेवटी नाईलाजास्तव १९३४च्या आसपास नीराताईशी आंतरजातीय द्वितीय विवाह केला. 'यशवंती विवाह' म्हणून या आंतरजातीय विवाहाची बरीच कुचेष्टा झाली. (१२) समाजात व आप्तस्वकीयांकडूनही यामुळ अपामानाची वागणूक मिळत होती पण पत्नी मात्र 'भाग्यशाली जोड' ठरली. पण लोकनिंदेच्या इंगळ्या डसत होत्या त्यामुळेच त्यांच्या कवितेत निराशावादीपणा आढळत असावा. आर्थिक चणचणीतून नेहमीच जावे लागले. सुखासीनता ऐश्वर्य मिळाले नाहीच. त्याचा सोसही त्यांनी धरला नाही.

मानधनाच्या अपेक्षेशिवाय स्वखर्चाने काव्यगयनाचे कार्यक्रम करुन कविता जनमानसात रुजविली आणि त्याबरोबच एक विचारधाराही. अख्या महाराष्ट्राला त्यांच्या काव्यगायनाचे वेड लागले होते. त्यांच्या कविता केवळ स्वत:शी वाचून मराठी रसिकवृन्दाचे समाधान होत नसे प्रत्यक्ष यशवंतांच्या तोंडून ती काव्ये ऐकणे हा एक 'अनुभव' होता. असाधारण अनुभव होता. 'काव्यरसात डुंबणे' म्हणजे काय ते कवी यशवंतांच्या काव्यगायन कार्यक्रमाच्या वेळी कळत असे. (१३)

**अमाप लोकप्रियता -**

यशवंतांहून अधिक कल्पकतेचे, अधिक प्रतिभा संपन्न, अधिक मधुर पद-ललिताचे किंवा अधिक विशाल ध्येयदृष्टीचे कवि महाराष्ट्र शारदेच्या दरबारात झाले नाहीत असे नाही. पण यशवंतांच्याइतकी लोकप्रियता दुसऱ्या कोणत्याच आधुनिक मराठी कवीच्या वाट्यास आली नाही. (१४) श्रातृजनांच्या सुखदु:खांना प्रौढ गंभीर वाणीने वाचा फोडणाऱ्या त्यांच्या कविता असल्याने त्या लोकप्रिय होतच होत्या पण सुगंधाला वाऱ्याची झुळुक भेटावी त्याप्रमाणे त्यांच्या रमणीय काव्याला पोषक गायनाची जोड लाभली आणि म्हणून यशवंतांना कमालीची लोकप्रियता मिळाली. (१५)

यशवंतांच्या काव्यगायनात योग्य त्या शब्दावर योग्य तो जोर देऊन काव्यांतील भाव मूर्तिमंत उभा करण्यावर कटाक्ष असे त्यांचे वीरश्रीयुक्त काव्य ऐकून ज्याचे अंत:करण भाराऊन गेले नाही. असा सुशिक्षित तरुण त्यावेळच्या महाराष्ट्रात सापडणे कठीण आणि त्यांची ' आई ' ही कविता ऐकली नाही असा मराठी भक्त विरळा व ती ऐकून आपले डोळे न पुसलेला सहृदयही विरळाच! 'आई ' सारखी काव्यरत्ने साठविणाऱ्या त्यांच्या 'यशोधन'या काव्यग्रथांच्या तीन आवृत्त्या अवघ्या चार वर्षातच निघाल्या हे यश मराठीत तरी अपूर्व होते.

यशवंतांनी आपली वैयक्तिक सुखदु:खे काव्यात अशा खुबीने मांडली की, त्यामुळे त्यामध्ये सार्वजनीक आकर्षण उत्पन्न व्हवे, बहुधा प्रत्येक वाचकाला 'राबलो वृथा संसार - सौख्य विभ्रमी' असा उद्‌वेग आलेला असतोच तो उत्कट भावनेने व प्रौढ भाषेने कवीने मांडलेला पाहताच वाचकाच्या मनाला पोटउकाला झाल्याचे समाधान लाभते असे मत दा.न. शिखरे मांडतात. (१६) तर रानडे - 'भावगीतात वर्णिलेली दु:खद स्थिती ही कवीच्या वैयक्तिक, सुखदु:खाची प्रतिबिंबे आहेत अशी मनाची कल्पना करुन घेऊन त्याच्या हळव्या हृदयाविषयी सहानुभूती वाटल्यामुळे रसिक वाचकांना व विद्यार्थ्यांवर्गाला यशवंतांची कविता अपूर्व वाटून मुखोद्‌गत करावीशी वाटली. अशी कारणमिमांसा करतात. (१७) पण हे दु:ख, निराशा ही स्वानुभवातून आलेली असावी असे कविता अभ्यासताना जाणवते. त्यांची कविता ही भाव्य करणारी नसून त्यांच्या मनाचा तो उत्कट भावनोद्‌गार आहे. म्हणूनही कदाचित त्यांना अधिक लोकप्रियता मिळाली असावी.

१९३४ च्या दिवाळीच्या सुमारास लोकप्रिय कवितांच्या सहा ध्वनिमुद्रिकांचा 'हिज मास्टर्स व्हाइस' ग्रामोफोन कंपनीने प्रसिध्द केल्यामुळे यशवंतांचे काव्यगायन सर्व ठिकाणी पोहोचले. स्थळ, काळ वेळेचे बंधन त्याने झुगारुन दिले.

**साहित्यसंपदा -**

विद्यार्थीदशेपासून यशवंतांनी काव्यलेखनात प्रारंभ केला. जवळजवळ सत्तर वर्षे त्यांनी काव्यलेखन केले. त्यांची साहित्य संपदा विपुल आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | मित्रप्रेमरहस्य | - | १९१९ |
| २) | तुटलेला तारा | - | १९२० |
| ३) | यशवन्ती | - | १९२१ |
| ४) | यशोधन | - | १९२९ |
| ५) | भावमंथन | - | १९३० |
| ६) | यशोगंध | - | १९३५ |
| ७) | यशोनिधी | - | १९४५ |
| ८) | यशोगिरी | - | १९४४ |
| ९) | ओजस्विती | - | १९४६ |
| १०) | वाकळ | - | १९५६ |
| ११) | पाणपोई | - | १९५१ |

SARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY KOLHAPUR

| | | | |
|---|---|---|---|
| १२) | पर्वकाल ये नवा | - | १९५९ |
| १३) | मुठे लोकमाते | - | १९६१ |
| १४) | कमण्डलू | - | १९६२ |

हे कवितासंग्रह याशिवाय

| | | | |
|---|---|---|---|
| १५) | जयमंगला | - | १९३१ |
| १६) | बंदिशाळा | - | १९३२ |
| १७) | काव्यकिरिट | - | १९४१ |

ही तीन खंडकाव्ये

| | | | |
|---|---|---|---|
| १८) | छत्रपती शिवराय | - | १९६८ |

हे महाकाव्य

| | | | |
|---|---|---|---|
| १९) | रणदुर्गा झाशीवाली | - | १९७७ |

हेही दिर्घ काव्य. ही दोन्ही ऐतिहासिक विषयावरील काव्ये आहेत. यशवंतांनी गद्यातूनही लेखन केले आहे पण त्यांच्या कवितेइतके ते सरस वटले नाही. त्यांचा मूळचा पिंड कवीचा आहे. गद्याचे माध्यम त्यांना रुचले नाही. त्यांची कवितेतील कामगिरीच अधिक उज्वल आहे. लक्ष वेधून घेणारी आहे. 'मित्रप्रेमरहस्य' हे त्यांचे पहिलेवहिले पुस्तकरुपाने प्रसिध्द झालेले काव्य. मित्र निधनावरील ही विलापिका आहे. चाफळच्या स्वामी घराण्यातले यशवंतांचे बालमित्र हनुमंत गंगाधर स्वामी हे १९१८ च्या इन्फ्लुएंझाच्या साथीत निवर्तले. त्या घटनेला अनुलक्षून हे काव्य लिहीले आहे. त्यानंतर 'तुटलेला तारा' हे टिळकांच्या मृत्यूनंतर त्यांच्यावर निहीलेले काव्य प्रसिध्द झाले. 'यशवन्ती' हा पहिला काव्यसंग्रह. निरनिराळ्या प्रसंगी प्रकाशित केलेल्या कविता या पुस्तकात पुस्तकरुपाने एकत्र केल्या आहेत. यातील कविता सरस व स्फूर्तिदायक आहेत. 'यशोधन' हा रसिकांच्या अत्यंत आवडीचा कवितासंग्रह होय. इतकी विविध आणि इतकी उत्कृष्ट भावगीते नवीन पिढीतील दुसऱ्या कोणत्याही कवीने लिहीलेली नाहीत. असा रसिकांचा अभिप्राय या पुस्तकाला मिळाला. 'भावमंथन' हे त्यानंतर प्रकाशित झालेले छोटेखानी पुस्तक. यातील चौदा सुनितांची माला किंवा गुच्छ हे कवीचे भावमंथन व यासोबत काही स्फुट कविताही जोडल्या आहेत. यशोगंध, यशोनिधी, यशोगिरी हे त्यानंतर प्रसिध्द झालेले कवितासंग्रह. 'ओजस्विनी' १९४४-४५ या दोन वर्षात लिहीलेल्या कवितांचा संग्रह. नम्र, सात्विक परंतू अन्यायाला कडवा प्रतिकार करण्याची वृत्ती या कवितासंग्रहात दिसते. 'वाकळ' मध्ये साध्या विषयात आशय मोठा किती आढळे. या न्यायाप्रमाणे साध्या साध्या विषयावर कविता लिहील्या आहेत. 'पाणपोई ' हा त्यांच्या निवडक कवितांचा संग्रह. त्यांच्या सर्व उत्कृष्ट कविता यात एकत्र केल्या आहेत. यानंतर त्यांचा स्फुट कवितांचा निघालेला एकमेव संग्रह 'कमण्डलू'. उत्तरायुष्यात त्यांची

दृष्टी प्रामुख्याने दिर्घ कवितेवर खिळलेली दिसून येते. 'मुठे लोकमाते', 'पर्वकाल ये नवा', 'छत्रपती शिवराय' आणि 'रणदुर्गा झाशीवाली' या त्यांच्या पुस्तकांवरुन हेच दिसते 'मुठे लोकमाते' हे पानशेतच्या धरफुटीवर लिहीलेले काव्य. १२ जुलै १९६३ ला पानशेतचे धरण फुटले अवघे पुणे शहर जलमय झाले. या जीवन विध्वंसक आपत्तीमुळे निर्माण झालेल्या उग्र विवंचना, लोकांच्या हालअपेष्टा, याचेवरील कवीचे भावनोद्‌गार म्हणने हे काव्य होय. 'पर्वकाल ये नवा' मध्ये संगितिका हा नवीनच काव्यप्रकार हाताळला आहे. कवितेचा नाटकात कसा वापर करता येईल किंबहुना पद्यातूनच नाटक कसे साकार होईल असा प्रयत्न इथे केला आहे. या कविता म्हणजे पद्यमय नाटीकाच आहेत. 'छत्रपती शिवराय' हे शिवरायांचे गौरवगान करणारे महाकाव्य. ५२१ पृष्ठांचे हे काव्य आहे. या काव्याद्वारे सर्व महाराष्ट्राच्या पूज्य देवतेला श्रध्दाजंली वाहिली आहे. या काव्याने त्यांना 'महाकवी' ची उपाधी मिळवून दिली. मराठीतील पहिले महाकाव्य लिहीण्याचा मानही त्यांचाच. इतिहासाचे विलक्षण आकर्षण यशवंतांच्या मनाला आहे. याची साक्ष त्यांच्या स्फुट कवितांतूनही मिळते. पण हे आकर्षण म्हणजे वेड नव्हे ती त्यांची निष्ठा आहे. 'छत्रपती शिवराय' हे महाकाव्य याची साक्षदेतेच. याशिवाय झाशीच्या राणीवर त्यांनी 'रणदुर्गा झाशीवाली' हे काव्यशिल्प घडविले आहे. हे स्फूर्तिगान ठरले आहे.

दीर्घस्वरुपाची कविता सुरुवातीलाही लिहीली आहे. खंडकाव्याच्या विकासाला हातभार लावण्याचे कार्य मोठ्या प्रमाणात रविकिरण मंडळाने केले. यशवंतांनी तीन खंडकाव्ये लिहीली आहेत. पण तिन्ही खंडकांव्ये एकमेकांपासून भिन्न आहेतच. पण तत्कालीन सर्व खंडकाव्यात आपले वेगळेपण दाखविणारी, जपणारी आहेत 'जयमंगला' हे त्यांचे पहिले खंडकाव्य. विल्हणाच्या 'चौरपंचाशिका' या काव्यावर आधारलेले. पण मूळ कथेचा फक्त गाभाच स्वीकारून कवीने काव्याची उभारणी केली आहे. भावगीतात्मकता हे याचे मोठेच आहे. प्रत्येक भावगीत स्वतंत्र असे आहे. आणि तरी कथानकाचा सांधा जोडण्याचे कामही करते. भावगीतातून कथा सांगण्याच्या यशवंतांच्या या प्रयत्नाचे बरेच कौतुक झाले. ''बंदिशाळा'' मध्ये बालगुन्हेगारीचे प्रतिपादन करून विषयाचे नाविन्य दाखविले आहे. तर ''काव्यकिरीट'' हे बडोद्याच्या प्रतापसिंह महारांजाच्या राज्यारोहन समारंभावरचे काव्य आहे. समारंभाचे वास्तुनिष्ठ वर्णन, राजीची स्तुती याबरोबरच राजाच्या कर्तव्याची त्याला जाणीव करूण देणे हा भाग यात आहे. या काव्यामुळे यशवंतांवर ''भाट'' गिरीचा आरोप झाला. पण यातून लोकशाहीची, आदर्श राज्याची तत्वेही प्रतिपादन केल्याने हा आरोप खोडून निघाला.

यशवंताची काव्यरचना अशी विविध आणि विपुल आहे. त्यांच्या या काव्यसेवेमुळेच त्यांना विविध पुरस्कार मिळाले. साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद मिळाले. सर्वात मोठा सन्मान म्हणजे लोकप्रियता.

**कवितेचे स्वरूप - विशेष**

यशवंतांनी ही विपुल काव्यरचना केली तिचे स्वरूप, कविची भूमिका, त्याच्या कवितेचे विशेष इत्यादींचा परामर्श घेणे गरजेचे आहे. त्यांच्या कविते मागील भूमिका/प्रेरणाच. -

''हा कागद आहे कोरा तुमच्या पुढती

त्यावरती उमटवा ऐशा निज अनुभूती

की पथिका होतील ध्येयाचा ध्रुवतारा

वादळी, सागरी, रणी संभ्रमी रानी.

हा कागद आहे तुमच्या हाती कोरा

त्यावरी मनोहर ऐसे काही चितारा

की खिन्नांच्याही अंत:करणामधल्या

झंकार कराया लागतील तारा'' (हा कोरा कागद - वाकळ)

ही त्यांच्या कवितेची कवीमनाची मूळ प्रकृती आहे. कवी यशवंतांची ही भूमिका प्रारंभीपासून होती. त्यांनी काव्यजीवनाच्या आरंभीच आपल्या कवितेला ''पाणपोई'' असेच संबोधिले आहे ते पांथस्थाला म्हणतात.

''येई भाई येथ पाही घातली ही पाणपोई

जो दुवा देशील पांथा तेवढी माझी कमाई''

१२ मे १९२७ ची ही कविता आहे. संसाराच्या उन्हाळ्यात होरपळणाऱ्या जिवांना आपल्या काव्यजलानं थंडावा दिल्याखेरीज कवी यशवंतांना चैन पडणारं नव्हतं, परमेश्वरानं यासाठी आपल्याला ा जगात पाठविलेलं आहे ही त्यांची मनोमन श्रध्दा होती. १९५० च्या मराठी साहित्य समेलनाच्या अध्यक्षपदावरून केलेल्या भाषणातही कवितेला पाथेय म्हटले आहे.

''आयुष्य हा एक प्रवास आहे आणि फार फाफटपसारा बरोबर घेऊन प्रवास करता येत नाही. त्यांत पाथेय हवेच असते. आणि ते सुध्दा शल्य तितके सुटसुटीत पण पौष्टीक असावे लागते. जीवितपाथेत हा कार्यभाग कवितेत साधायचा असतो.'' (१८)

कविता ही जिवनाला साह्यकारक पोषक व्हावी ही त्यांच्या कवितेची प्रेरणा आहे.

त्यांची कविता प्रामुख्याने भावगीतात्मक आहे. उत्कृष्ट भावकवी अशी बिरूदावली त्यांना मिळाली आहे. त्यांची कविता प्रासादिक आहे क्लीष्ट नाही. वाचकांची अवगणता कुठेही नाही. आपली कविता रसिकांसाठी आहे याची जाणीव क्षणोक्षणी ठेवलेली आढळते. त्यामुळेच जिथे वाचकाला समजणार नाही तिथे कवि स्वत:च आपल्या कवितांवर भाव्य करतो. कवितासंग्रहांचा शेवटी दिलेल्या टिपा किंवा कवितेच्या शिर्षभागी दिलेला आशय ह्या गोष्टी याचेच निदर्शक होत. त्यांची कविता छदोबध्द आहे. मुक्तछंद त्यांनी फारसा हाताळला नाही. रविकिरण मंडळाने जे रचना विषयक प्रयोग केले ते ही त्यांच्या कवितांत आले. त्यांची कविता गेयपूर्ण आहे. पण ही गेयता काव्यातील आशय मारीत नाही. यमकांचा वापर तर त्यांनी खूप केला. यशवंतांइतकी यमकांची खैरात दुसऱ्या कुणी केली नसेल.

लोकमान्य टिळकांच्या मृत्यूनंतर भारताच्या राजकारणाला महात्मा गांधीनी जोरदार कलाटणी दिली या नवीन राजकारणापासून मध्यमवर्गातील बहुसंख्य समाज उदासिन राहिला. यशवंत हेही या मध्यमवर्गातीलच कवी होते. त्यांची कविता राजकारणापासून अलिप्तच आहे. पण राष्ट्रप्रेमाचा झरा त्यांनी आपल्या काव्यात आणला याची सुरूवात झाली 'देहाचा पूल' या कवितेपासून 'देहाचा पूल' नंतर ऐतिहासिक प्रसंगावर स्फुट कविता लेखनही केले. स्वातंत्र्यलढ्याचाही आशय कवितेतून व्यक्त केला. तो कधी प्रकट तर कधी आडपडद्याने महाराष्ट्राविषयीचा सार्थ अभिमान बाळगणाऱ्या काही कविता (महाराष्ट्रगीते) दिसतात. मराठ्यांच्या इतिहासाविषयी त्यांना अभिमान आणिआकर्षण होते. 'छत्रपती शिवराय' हे महाकाव्य त्यांच्या राष्ट्रप्रेमाची साक्षच देते. त्यांच्या राष्ट्रीय बाण्याच्या पण ऐतिहासिक कवितांचे प्रेरणास्थान त्यांचे बालपण असेल. समर्थांच्या आणि शिवरायांच्या पदस्पर्शाने पुनित झालेल्या भूमित त्यांचे बालपण गेले त्याचाही हा परिपाक असेल. त्यांची ग्रामीण (जानपद) कविता हाही त्यांच्या या खेडयात गेलेल्या जीवनाच्या अनुभवाचाच परिपाभ होय. पहिली ग्रामीण कविता लिहीण्याचे श्रेय ज्यांना द्यावे त्यात यशवंतही आहेत.

त्यांच्या कवितांत झुंजारपणा आढळतो निराशावादिपणाचा सूर बहूतेक कवितांत आढळत असला तरी या निराशेवर मात करणारा आशावादच बहुतेक कवितांतून आढळतो. संकुचितपणाकडून विशालतेकडे जाण्याची त्यांच्या मनाला ओढ आहे आणि म्हणून. ''सरिता करिते का कधी खंत'' किंवा ''अफाट सागर पुढे'' सारख्या कविता ते लिहीतात.

प्रेमाच्या बाबतीत शारीरिकतेपासून दूर जाण्याचा आणि स्त्रीला सन्मान देण्याचा प्रयत्न तत्कालीन कवितेत झाला. म्हणून ''जयमंगला'' या प्रेमकाव्याची प्रेमकथा पूर्वसूरींच्या शृंगार वर्णनातून मुक्त केली आहे. शरीरी सौंदर्यापेक्षा भावसौंदर्याला त्यांनी महत्व दिले. प्रेमकवितेच्या बाबतीतही कल्पनेपेक्षा वारातवातच ते अधिक रमतात. ''त्यांच्या काव्यात येणारे शृंगार वित्रण हे सदैव संयात, सौम्य आणि मधुर असेच आहे''. (१९)

**दुः:खाचे शाहीर** – प्रसिध्द समीक्षक माधव मनोहर यांनी यशवंतांना दु:शाचे शाहीर म्टले आहे. त्यांच्या कवितातील निराशावादी स्वरामुळे त्यांनी असे म्हटले असावे तिव्र निराशेने जणू त्याने जीवन व्यापून टाकले आहे असे त्यांच्या या कविता वाचताना लक्षात येते. सामान्य माणसाच्या वाटपाला येणाऱ्या दु:खाचे चित्रण त्यांनी उत्कटपणे केले. त्यांच्या कवितेतले दु:ख हे त्यांच्या व्यक्तिगत जीवनातील आहे की काय अशी शंका म्हणण्यापेक्षा खात्रीच वाचकाला वाटते. इतकी उत्कटता या प्रकारच्या कवितांना आलेली असते. आणि ते खरेही असावे. पूर्वायुष्यात आर्थिक चणचणीतून जावे लागले त्यामुळे आलेली निराशा, पहिले लग्न पत्नीच्या विक्षिप्त स्वभावामुळे यशस्वी झाले नाही, म्हणून दुसरे लग्न केले. पण हे आंतरजातीय होते त्यामुळे समाजाकडून बरीच अवहेलना सहन करावी लागली. याचे पडसाद त्यांच्या कवितेत उमटणे स्वाभाविक आहे. यात सत्याचा वाटा कितीसा हे कोण ठरवणार पण सामान्यत: सुशिक्षित मध्यमवर्गीयांच्या आशाआकांक्षा प्रतिकूल परिस्थीतीमुळे पूर्ण होत नसल्याने होणारी निराशा त्यांच्या कवितातून व्यक्त होते. माधव मनोहरांनी त्यांना 'दु:खाचे शाहीर' म्हटले आहे. पण यशवंतांनी दु:खाचा गौरव केलेला नाही वा दु:खचितनातून तत्वज्ञानही शोधलेला नाही. असे निशिकांत ठकार म्हणतात. (२०) ते खरेच आहे. त्यांनी वस्तुनिष्टपणे दु:खाचे चित्रण केले आहे. जीवनात कसलेच सुख नाही नुसती निराशा भरून राहिली आहे, समजाकडून उपेक्षा होते आहे, आणि स्वत:तही फारसे सामर्थ्य

नाही, आलेल्या निराशेमुळे मृत्यूची ओढ लागली आहे असे त्यांच्या निराशावादी कवितांचे स्वरूप आहे. तत्कालीन कवीच्या तुलनेत यशवंतांची कविता निराशवादीपणाचे सूर अधिक आळवते. ते त्यांचे वैशिष्ट्य आणि मोठेपणही ठरले. त्यांच्या लोकप्रियतेमागे हाच मोठा मुद्दा होता की त्यांच्या कवितांतील दु:ख हे सामान्य माणसाला आपल्या आयुष्याशी साम्यदर्शक वाटले. निराशा ही त्यांच्या आत्मनिष्ठेचा भाग होती त्यामुळेच त्यांची या प्रकारची कविता विशेष सामर्थ्याने प्रकट झाली आहे.

**उत्कृष्ट भावगीत कवी**

यशवंतांची जीवनाकडे पाहण्याची दृष्टी स्थिर नैराश्याची असली तरी त्यानी विविध विषयावर काव्यरचना केली आहे. प्रेम, कुटुंब, समाज, जानपदाचे जीवन असले विषय त्यांच्या कवितात येतात. विषयांची विपुलता असली तरी त्यांची कविता कथनपरतेत अथवा बाह्य वर्णनात फारसा रस घेत नाही. तिला ओढ आहे अंतरंगाची, त्यांच्या सर्वच प्रकारच्या कवितेत त्यांनी भावनेला महत्व दिले आहे. त्यांची बहुतांशी कविता कुणाची ना कुणाची आत्मपर कविता असते. ''काव्यकिरिट'' हे खंडकाव्य प्रसंगपर असूनही त्यात महत्व आहे, रयतेच्या, राजाच्या आत्मपर उद्‌गारांना. या काव्यात नदीलाही बोलायला लावले आहे. जगातल्या सर्व गोष्टींकडे भावनोत्कट रितीने पाहण्याची दृष्टी ते वाचकाला देतात.''.... या भावनेला उपमा - दृष्टांत - उत्प्रेक्षा यांची जोड देतांना त्यांच्या काल्पनाशक्तीचा सुदर अविष्कार होतो. व भावनेच्या उत्कटतेत कल्पनेच्या सौंदर्याची भर पडते. याबाबती यशवंत हे समकालीन अशा कोणाही कवीपेक्षा श्रेष्ठ ठरतील.'' (२१) यशवंत आपल्या कवितातून विचार, अर्थचमत्कृती, भाषेचे सौंदर्य, शब्दांचे स्वामित्व यावर फारसा भर देत नाहीत. त्यातून भावनोत्कटताच जास्तीत जास्त प्रत्ययाला येते. रसिकांच्या भावनेला त्याद्वारे आवाहन घातले जाते.

पहिल्यापासून भावगीतरचना हीच काव्य प्रकटीकरणास त्यांना योग्य वाटली असावी आणि त्यावर त्यांचे प्रभुत्वही आहे. हे प्रभुत्व 'जयमंगला' या भावगीतातूनच साकारलेल्या खंडकाव्यातून जाणवते. भावनांच्या आंदोलनावर आणि भावनिक सौंदर्यावर त्यांचा भर असतो.

इतर कोणाही कवीपेक्षा अधिक आणि चांगल्या प्रकारे त्यांनी भावगीतांची रचना केली जाते म्हणूनच त्यांना भावगीतकवी म्हटले जाते.

**जनसामान्यांचे कवी**

रविकिरण मंडळातील इतर कवींच्या तुलनेत यशवंताना अधिक लोकप्रियता मिळाली. याचे एक गमक म्हणजे जनसामान्यांच्याच सुखदु:खांना त्यांनी आपल्या कवितातून वाचा फोडली. तेही मध्यमवर्गीयच होते. त्यामुळे त्यांना स्वत:ला येणारे अनुभव हे जनसामान्यांना येणाऱ्याअनुभवासारखेच असतात. तेच त्यांनी काव्यातून प्रकट केल्याने वाचकांनाही ते आपलेच वाटले लोकांच्यात कवितेबद्दलची अनावड होती ती घालवून देण्यासाठी त्यांनी काव्यगायनाचे कार्यक्रम सुरू केले. काव्यगायनाच्या वेळी समोर जो श्रोत्रवर्ग असेल, त्याचेच सुख दु:ख कवितेतून व्यक्त केल्यास त्याला ते अधिक प्रिय होणार. पण ही हेतूपर्वकता यशवंतांच्या

कवितेत दिसत नाही. सामान्य वर्ग हा एका सरळ रेषेत जाणारा आपल्या ठराविक परिघात जगणारा जगातील घडामोडींपासून थोडा दूर असणारा, स्वत:च्याच सुखदु:खात रमणारा, असा असतो. यशवंतांच्या कवितेतून हा सामान्य माणूसच प्रामुख्याने दिसतो. ते जणू सामान्य माणसाचे प्रतिक वाटतात. म्हणूनच त्यांच्या सामाजिक कवितेत केशवसुतांसारखा उकळता, उफाळता आवेश नाही. प्रेमभावनेत उत्तानता नाही. की भडक शृंगारचित्रण नाही. प्रेमभावनाही प्रामुख्याने पत्नीशी निगडीत असलेलीच दिसते. कल्पना विश्वातल्या सुंदरींचे त्यांना आकर्षण नाही. फक्त जननिंदेचे भय सोडून प्रेमात एकरुप होऊन जावे हा आशय व्यक्त होतो. कौटुंबिक जीवन त्यातील नातेसंबंध, प्रेम, जिव्हाळा, वात्सल्य हेही यशवंतांनी आपल्या कवितेतून चित्रित केले आहेत.

सामान्य माणसाचे सर्व विशेष त्यांच्या कवितेत दिसतात. काव्यगायनाच्या श्रध्देमुळे कवींनी आपली कविता सामान्यांच्या पातळीवर आणली आणि म्हणून ती सामान्य ठरली अशी टिका यावर केली जाते. पण - ''रविकिरणमंडळाचा हा खास मोठेपणा आहे की काव्याच्या प्रांतात वावरुनही त्यांनी साधारण जीवनाचे वास्तवता शून्य वर्णन केले नाही साधारणांच्या भावना व आकांक्षा त्यांनी साधारणांच्या भूमिकेवरुनच व्यक्त केल्या. (२२) काव्यगायनाच्या कार्यक्रमांद्वारे त्यांनी जनसामान्यांपर्यंत कविता नेली, रुजविली, जनसामान्यांच्या हृदयात स्थान मिळविले.

**जनप्रेमाची पावती -**

गोविंदाग्रजांइतकी लोकप्रियता आणि तांबे यांच्यासारखे भाग्य लाभलेला यशवंतांसारखा दुसरा कवी नाही.(२३) त्यांच्याइतकी अमाप लोकप्रियता दुसऱ्या कोणत्याही कविला मिळाली नाही. त्यांच्या काव्यगायनाचे सर्व महाराष्ट्राला वेड लागले होते. मानधनाच्या अपेक्षेशिवाय, स्वत:चाच प्रवासखर्च करुन त्यांनी काव्यगायनाचे कार्यक्रम केले. त्यांनी उत्तमोत्तम काव्य निर्मिती करुन जशी रसिकांची सेवा केली तसेच रसिकांनीही त्यांना दाद देऊन त्यांचा गौरव केला. लोकप्रियता त्यांना भरपूर मिळालीच पण अनेक मानसन्मांनांनी त्यांना भूषविले. व त्यांच्या काव्य कर्तृत्वावर लोकमान्यतेचे शिक्का मोर्तब केले. साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद त्यांना लाभले. पद्मभूषण हा किताब मिळाला. महाराष्ट्र कवी हाकिताबही मिळाला. त्यांनी साधारण प्रकृतीची कविताच प्रामुख्याने लिहीली असा आरोप केला गेला. पण कविता जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्याचे, रुजविण्याचे कार्य केले. आणि हे काम जबाबदारीने केले. एकनिष्ठेने केले. आपल्या भूमिकेशी ते कायम राहिले. काव्यापाठीमागची त्यांची भूमिका ही सत्य, शिव, सुंदराची उपासना करणारी होती. १९५०च्या साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदावरुन काव्य विश्वात कोलाहल मांडलेल्या नवकवितेविषयी त्यांनी काही मते मांडावी अशी लेखी-तोंडी बरीच विनंतीपत्रे त्यांना मिळाली होती. लोकांच्या मनातील यशवंतांचे स्थान आणि त्यांच्या कवितेचे स्वरुप हे यावरून लक्षात येते तसेच लोकांची त्यांच्याविषयीची निष्ठाही प्रगट होते. यशवंतांचे नाव घेतले की आजही प्रत्येक मराठी माणसाला त्यांची 'आई 'कविता आठवते.

त्यांच्या मरणोत्तर त्यांच्या चाहत्यांनी त्यांच्याविषयी व्यक्त केलेले अभिप्राय त्यांचे लोकांच्या मनातील स्थान किती उंच होते ते दिखवितात.

१) मंगेश पाडगावकर - यशवंतांच्या कवितेने मराठी भाषिकांच्या तीन पिढ्यांवर संस्कार केले त्यांच्या कवितेइतकीच त्यांची काव्यगायने लोकप्रिय होती. सर्वसामान्य जनतेपर्यंत कविता नेऊन पोचविण्याचे आणि लोकांमध्ये कवितेविषयी प्रेम निर्माण करण्याचे मोठे श्रेय यशवंतांनाच छायावे लागेल.

(लोकसत्ता २७ नोव्हें. १९८५)

२) पु.ल.देशपांडे - असंख्याच्या मनात घर करून बसलेले कवि म्हणजे कवि यशवंत. त्यांच्या निधनाचे वृत्त ऐकताच एक जुना परिचयाचा वृक्ष कोसळून पडलयासारखे वाटले. त्यांच्या निधनाने जुन्या जमान्यातील मोठा कवी गेला. त्यांची देणगी म्हणजे महाराष्ट्रात त्यांनी कविता घरोघर पोहोचविली.

(लोकसत्ता २७ नोव्हें. १९८५)

याशिवाय त्यांच्यावर स्वतंत्र लेख लिहून त्यांच्या कवितेचे मोठेपण विशद केले.

''कवि यशवंतांनी सामान्यांच्या जीवनातील बरेवाईट चढउतार यशापयश यांचे आलेख रेखाटले. त्याचप्रमाणे सामाजिक स्तरावरील जाणीवही अनेक कवितांतून व्यक्त केल्या त्यामुळे ते तुमचे आमचे कवी वाटतात.''

(डॉ. वि. म. कुलकर्णी -'स्वराज्य' ९ ते १३ डिसेंबर १९८५)

याशिवाय, बापूसाहेब गोखले, वा. ग. तळवलकर, व. दि. कुलकर्णी, रमाकान्त देशपांडे, मो.ज्ञ. शहाणे आणि त्यांच्या सहृदयांनी त्यांच्या कवितेविषयी लिहून त्यांना श्रध्दांजली वाहिली आहे. या सगळ्यातून यशवंतांचे मोठेपणच प्रत्ययाला येते.

यशवंतांच्या वाङ्‌मयीन कर्तृत्वाचा परामर्श येथपर्यंत घेतला. यशवंतांनी विपुल आणि दिर्घकाळ काव्यरचना केली आहे. (संग्रहरूपाने प्रसिध्द झालेल्या कवितेव्यतिरिक्त वर्तमानपत्रातून स्फुट कविता लेखन केले आहे ते वेगळेच.) त्यांची कविता विविध स्वरूपाची आहे. स्फुट कविता, दिर्घ कविता, खंडकाव्य, महाकाव्य, संगितिका, विलापिका, बालगाणी इत्यादी काव्यप्रकार त्यांनी हाताळले आहेत. स्फुट कवितारचनेत विविध विषय हाताळले आहेत. त्यांच्या काव्यरचनेवर जरी काही उलटसुलट टिका झाली असली तरी त्यांच्या कवितेची दखल किती आदराने घेतली होती हे त्यांना मिळालेल्या बहुमानांवरून स्पष्ट होते. 'महाराष्ट्र कवी' ही सर्वोच्च बहुमानाची पदवी त्यांचे लोकांच्या ह्दयातील त्यांचे स्थान दर्शविते. महाराष्ट्राच्या साहित्यप्रांतात त्यांचे नाव उल्लेखनियच आहे.

## संदर्भ टिपा


१) 'पाणपोई ' : संपादक प्रस्तावना वि.स.खांडेकर कॉन्टीजेन्टल प्रकाशन पुणे सातवी आवृत्ती प्रस्तावना पृ. १०

२) तत्रैव : पृ. १०-११

३) 'कवी गिरीश एक साहित्यिक आकलन' : डॉ. प्रभावती येळगावकर सन्मित्र प्रकाशन कोल्हापूर १९९७, प्रथमावृत्ती.

४) अर्वाचित मराठीतील खंडकाव्ये. : ह.की. तोडमल, पीएचडी - प्रबंध पुणे विद्यापीठ १९६१.

५) उ.नि. : कवी गिरीश एक साहित्यिक आकलन पृ. २१

६) उनि. अर्वाचीत मराठीतील खंडकाव्ये.

७) 'साहित्यिक गप्पा दहा साहित्यिकांशी' : (जयवंत दळवी), सन पब्लिकेशन्स १८८५ पृ. १९५१

८) तत्रैव : पृ. १५१

९) तत्रैव : पृ. १५२

१०) तत्रैव : पृ. १५३

११) 'छत्रपती शिवराय' : कॉन्टीनेन्टल प्रकाशनपुणे १९६१ प्रथमावृत्ती प्रस्तावना.

१२) 'यशवंत युगाचा अस्त' : मो.श. शहाणे, केसरी, डिसेंबर १९८५.

१३) 'काव्यगायनाची ती पाणपोई ' : रमाकांत देशपांडे, लोकसत्ता, डिसेंबर १९८५.

१४) 'आधुनिक कवी भाग दुसरा. : दामोदर तरहर शिखरे . दि. रिसर्च आयडिकल पब्लिशिंग हाऊस लि. पुणे., प्रथमावृत्ती १९५३. पृ. ७१

१५) तत्रैव : पृ. ७२

१६) तत्रैव : पृ. ६९

१७) यशोगंध : यशवंत, प्रकाशक - य.दि. पेंढारकर, पुणे २, १९३५. पहिली आवृत्ती, प्रस्तावना - म.गो. रानडे. पृ. १

१८) अखिल भारतीय मराठी साहित्यसंमेलनाचे अध्यक्ष (१९५० - मुंबई) म्हणून यशवंतांनी केलेले भाषण.

१९) साहित्य रुप आणि गंध ग.दि. कुलकर्णी - मॅजेस्टिक प्रकाशन मुंबई, १४ जानेवारी १९७६ प्रथमावृत्ती. पृ. ८१.

२०) मराठी कविता स्वरुप आणि विवेचन - निशिकांत ठकार, स्वाध्याय महाविद्यालय प्रकाशन पुणे, नोहेंबर १९७७ प्रथमावृत्ती. पृ. २९१

२१) 'अर्वाचित मराठी काव्य' रा.श्री. जोग, मुंबई, मराठी साहित्य संघ, द्वितीय आवृत्ती-१९५१, पृ. २०७.

२२) 'पासंग' कुसुमावती देशपांडे, मौज प्रकाशन मुंबई, चौथी आवृत्ती-१९८७, पृ.३६

२३) उनि. मराठी कविता स्वरुप आणि विवेचन : पृ. २९०